MHLA050004032021

विशेष दिवाणी दावा क्र. २१/२०२१

**आदेश नि.क्र. ४८ वर**

प्रतिवादी क्र.४ यांनी कैफीयत दाखल करण्यास झालेला ४३ दिवसांचा विलंब माफ करून कैफीयत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

२. या अर्जावर वादीने म्हणणे देऊन अर्जास तीव्र आक्षेप घेऊन अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. दोंन्ही बाजुच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.४ यांच्या वकिलांचे म्हणणे असे की, काही महत्वाची कागदपत्र वेळेत मिळाली नसल्याने कैफीयत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. हा विलंब जाणुनबुजून झालेला नाही. वादीच्या वकीलांचा युक्तिवाद असा की प्रतिवादीकडे पुरेसा वेळ असुनही कायदयाप्रमाणे विहित मुदतीत कैफीयत दाखल केली नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचे प्रकरण हे शेतजमीन व पैश्याच्या संदर्भात असल्याने दाव्याचा गुणदोषावर निर्णयासाठी प्रतिवादींची कैफीयत दाखल करून घेणे न्यायोचित होणार आहे. हा अर्ज मंजूर केल्यास वादीचे कांहीही नुकसान होणार नाही. उलट अर्ज मंजूर न केल्यास प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. परंतू विलंब माफ करतांना प्रतिवादीवर खर्च बसविणे न्यायोचित होणार आहे. म्हणून मी खालील आदेश देतो.

**आदेश**

प्रतिवादी क्र.४ यास कैफीयत दाखल करण्यास झालेला विलंब वादीस रक्कम रू. २००/- खर्च देण्याच्या अटीवर माफ केला आहे.

Digitally signed by PRASAD ANANT SAVADIKAR
Date: 2022.06.06 15:35:17 +0530

**(प्र. अ. सवदीकर)**

दिनांक ०६/०६/२०२२.

दिवाणी न्यायाधीश व. स्तर,

अहमदपूर.